# प्रेसनोट

दिनांक ०७/०६/२०१९

मा. पोलीस अधिक्षक वसंत परदेशी सो यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारलेल्या पासुन मालमत्तेचे उघड न झालेले गुन्हे उघड करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली. सदर मोहिमेतंर्गत वाशिम पोलीस दलास खालील गुन्हे उघड करण्यास यश प्राप्त झाले आहे.

**वाशिम शहरामध्ये भरदिवसा चौपाल सागरच्या मॅनेजरला लुटणाऱ्या टोळीस अटक**

दिनांक ०६/०५/२०१९ दुपारी १४:०० जे १४:१५ वाचे दरम्यान चौपाल सागरचे मॅनेजर हे पैसे बँकेत जमा करण्यासाठी जात असतांना वटाने लॉन जवळ त्यास काही अज्ञात चोरटयांनी त्यांची मोटार सायकल अडवुन, मारहाण करून त्यांचे कडील ९,६०,०००/— रोख रक्कम जबरीने चोरी करून नेले. सदर प्रकरणी वाशिम शहर पोलीस ठाणे येथे अप क्र १४६/१९ भादवी कलम ३९४,३४ प्रमाणे दाखल करून सदर गंभीर स्वरूपाच्या गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. पवन बन्सोड यांचे कडे देण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक सो यांचे आदेशानुसार सदर गुन्हयाचे तपासात शहर पोलीस ठाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथील अधिकारी व कर्मचारी यांचे तिन पथक तयार करण्यात आले. पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मिळालेल्या माहितीनुसार ग्राम काटा येथील पुढील आरोपीतांना अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

१) शुभम विठ्ठल जाधव, २) प्रतिक किसन सुर्वे (देशमुख), ३) कृष्णा ऊर्फ चेतन भाऊराव देशमुख, ४) विठ्ठल भगवानराव सुर्वे (देशमुख), ५) अजय महादेव कंकाने, ६) चंद्रकिर्ती गजानन बन्सोड, ७) दिपक रतन बन्सोड तसेच एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांचा सहभाग असल्याचे निष्पण झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्हयात एक आरोपीत फरार आहे. अटक आरोपीत यांचे कडे बारकाईने तपास केला असता त्यांनी सदर गुन्हया करण्यासाठी ०८ दिवसापुर्वी कट रचुन सदरचा गुन्हा केल्याचे निष्पण झाल्याने सदर गुन्हयात भादवी कलम ३९५ व १२० (ब) वाढविण्यात आले आहे. सदर गुन्हयातील आरोपीत हे सद्या पोलीस कोठडीत आहेत. आज पावेतो केलेल्या तपासातुन आरोपीत नामे प्रतिक सुर्वे (देशमुख) याचे कडुन १,५३,०००/— रोख रक्कम, आरोपीत नामे शुभम जाधव याचे कडुन ३२,०००/— रोख रक्कम, गुन्हात वापरलेली ६०,०००/— रूपये किंमतीची पांढऱ्या रंगाची असेस गाडी जप्त करण्यात आली आहे. तसेच आरोपीत नामे शुभम याने त्याचे शेतीचे १,१५,०००/— रूपयाचे लोन परत फेड केली असल्याचे निष्पण झाले तर त्याचेच बँक खात्यात ४५,०००/— रू असल्याचे दिसुन आल्याने त्याचे बँक खाते फ्रिज करण्यात आले आहे. यातील विधीसंर्घषग्रस्त बालक याचे कडुन गुन्हयात वापरलेली ५०,०००/— किंमतीची हिरो होन्डा स्प्लेन्डर गाडी जप्त करण्यात आली आहे. आज पावेतो केलेल्या तपासात अटक आरोपीत यांचे कडुन ४,५५,०००/— रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सर्व आरोपीत यांचा दिनांक १०/०६/२०१९ पावेतो पोलीस कोठडी मिळालेली आहे. तसेच यातील अटक आरोपीत नामे दिपक रतन बन्सोड यांचे विरूद्ध १) पोस्टे मानवत जिल्हा परभणी येथे अप क्र ३९/१५ भादवी कलम ३७९ प्रमाणे, २) पोस्टे खदान जिल्हा अकोला येथे अप क्र ३८१/१७ भादवी कलम ३९९,४०२,३४ प्रमाणे

## <u>दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला अटक :—</u>

दिनांक २५.०५.२०१९ रोजी पोलीस उपनिरीक्षक दिनकर गोरे यांना मिळालेल्या माहीती वरुन सापळा रचुन दरोडा करण्याच्या तयारीत असलेली टोळीस ताब्यात घेवुन त्यांचे कडुन दरोडा घालण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहीत्यासह एकुण १,४१,६६०रु चा माल जप्त करुन आरोपी १. लक्ष्मण मधुकर चव्हाण २.सज्जन मधुकर चव्हाण ३.कन्हैया मधुकर चव्हाण सर्व रा.पांगरखेडा ४. रामेश्वर किरीम पवार ५.राजु किरीम पवार दोन्ही रा.जानेफळ जि.बुलढाणा यांचे विरुध्द पो.स्टे.मालेगाव येथे अपराध क्र १७४/१९ कलम ३९९,४०२ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच सदर अटक आरोपीत यांचे कडे अधिक विचारपुस केली असता त्यांनी यापुर्वी **पोस्टे जानेफळ जिल्हा बुलढाणा येथील अपराध क्रमांक १२/१९ भादवी कलम ४२०,३९५ प्रमाणे दाखल गुन्हयातील गेला माल १०,९६,०००/— रोख** रक्कमेचा गुन्हा व **पोस्टे हिंगोली ग्रामिण जिल्हा हिंगोली अप क्रमांक २४७/१८ भादवी कलम ३९५ प्रमाणे दाखल गुन्हयातील गेला माल ३,०५,०००/—** रू रक्कमेच्या केलेल्या दरोडयाची कबुली दिल्यामुळे सदर आरोपीत यांचे कडुन **<u>एकुण ०३ दरोडयाचे गुन्हे उघडकीस आले</u>**.

## <u>वाशिम जिल्हयात रोड रॉबरी करणारी टोळीस अटक</u>

वाशिम शहराचे परीसरात रात्रीच्यावेळी होत असलेल्या रोड रॉबरीवर अंकुश ठेवण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांनी विशेष मोहीम चालु केली त्याअनुषगांने रेकॉर्ड वरील आरोपीत नामे राहुल प्रेम धबाले यांस स्थागुशा पथकांने रेल्वे स्टेशन परीसरातुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांने त्याचे साथीदार नामे १) शिवदिप प्रकाश धबाले, २) देव संजय भगत, ३) योगेश मारोती लाहे, ४) विशाल ऊर्फ टिल्या शेलार यांनी पोस्टे वाशिम ग्रामिण हद्दीत पुढील गुन्हे केल्याची माहिती दिली.

१) पोस्टे वाशिम ग्रामिण अप क्र १०७/१९ भादवी ३९२,३४,

**<u>गेला माल</u>** ८,५००/:— रु रोख रक्कम व ११००/—रु किंमतीचा मोबाईल व एक सोन्याची पोत

**<u>आरोपीत कडुन हस्तगत माल</u>** :— ११००/— रू किंमतीचा मोबाईल, सोन्याची लगड, व गुन्हयात वापरलेले दोन चाकु

२) पोस्टे वाशिम ग्रामिण अप क्र १३१/१९ भादवी कलम ३९२,३४ प्रमाणे

**<u>गेला माल :—</u>** ५,०००/—रु रोख रक्कम

**<u>आरोपीत कडुन हस्तगत माल :—</u>** १२००/— रू रोख रक्कम व गुन्हयात वापरलेले चाकु

## <u>गोडावुन फोडुन धान्याची चोरी करणारी टोळीस अटक</u>

वाशिम जिल्हयामध्ये असलेल्या धान्य गोडाऊन फोडुन होत असलेल्या चोऱ्या उघडकीस आणण्यासाठी मिळेलेल्या माहिती नुसार ग्राम अंजनखेडा येथील १) पिंटु ऊर्फ हनुमान विठ्ठल पायघन, २) लखन ऊर्फ ईश्वर रामभाऊ पायघन, ३) मारोती दत्ता मोरे, व ४) विठ्ठल काशिराम पायघन यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी पुढील प्रमाणे गुन्हयाची कबुली दिली.

१) पोस्टे वाशिम ग्रामिण अप क्र २०/१९ भादवी कलम ४६१,३८०,३४ प्रमाणे व २) अप क्र १०५/१९ भादवी कलम ४५७,३८०,३४ प्रमाणे

**<u>गेला माल :—</u>** १७१ क्विंटल सोयाबिन किंमत ६,४०,०००/— रू किंमत

**आरोपीत यांचे कडुन हस्तगत केलेला माल :—** ८५ क्विंटल सोयाबिन किंमत ३,४०,०००/— रू किंमत

३) पोस्टे मंगरूळपिर अप क्र १३७/१९ भादवी कलम ४६१,३८०,३४ प्रमाणे

गेला माल :— ३७ कट्टे तुर व १३ कट्टे हरभरा एकुण किंमत ६९,०००/— रू

आरोपीत यांचे कडुन हस्तगत माल :— २८ कट्टे तुर व १३ कट्टे हरभरा एकुण किंमत ६२,०००/— रू

**घरफोडी गुन्हयातील आरोपीतास जालना जिल्हयातुन अटक**

पोलीस ठाणे रिसोड येथील अपराध क्रमांक ९६/१८ भादवी कलम ४५७,३८० प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपीत नामे शेषराव गोवर्धन पवार वय ३१ वर्षे, रा. वरखेड/अचानक तांडा ता. जि. जालना यांने रिसोड येथे घरफोडी केल्याची गोपणीय माहिती मिळाली असता स्थागुशा पथकाने यातील आरोपीतास त्याचे राहत्या घरून अटक केली,

**गेला माल :—** २०,०००/— रू किंमतीचे दागीने व मोबाईल फोन

**आरोपीताकडुन हस्तगत माल :—** १०,०००/— रू किंमतीचे मोबाईल फोन

**रात्रगस्त दरम्यान केलेली कार्यवाही**

**१) चोरीच्या प्रयत्नातील आरोपीस अटक :—**

मा. पोलीस अधिक्षक सो यांचे आदेशान्वये जिल्हयातील मालमत्तेच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी नाकाबंदी व कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. दिनांक ०४/०६/२०१९ रात्री कोम्बींग ऑपरेशन दरम्यान स्थागुशा पथक रात्रगस्त करीत असतांना शिरपुर पोलीस ठाणे हद्दीत १) करण ऊर्फ हिंम्मत नंदु पवार व २) विशाल कलबल्या चव्हाण हे चोरी करण्याचे उद्देशाने फिरत असल्याची गोपणीय माहिती मिळाली असता त्यांना पकडण्यासाठी पांगरखेडा फाटा येथे सापळा रचण्यात आला व करण ऊर्फ हिम्मत नंदु पवार यास शिताफिने अटक करण्यात आली त्याची झडती घेतली असता त्याचे कडे घरफोडी करण्यासाठी उपयोगात येणारे साहित्य जप्त करून पोस्टे शिरपुर येथे गु.रजि.नं १२१/१९ भादवी कलम ४०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**२) स्टँडिंग वॉरंट मधील आरोपीतांना अटक :—**

वर्षानुवर्ष मिळुन येत नसलेले आरोपीत यांना अटक करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक सो यांनी विशेष मोहिम हाती घेतली होती. सदर मोहिमे अंतर्गत वाशिम जिल्हयातील आज पावेतो एकुण २२ आरोपीतांना अटक करून मा. न्यायालयाचे समक्ष हजर करण्यात आले आहे.

**३) मालमत्तेच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी रेकॉर्ड वरील आरोपीताना चेक करण्यात आले.**

वाशिम जिल्हयातील मालमत्तेच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक सो यांचे संकल्पनेतुन वाशिम जिल्हातील मालमत्तेच्या गुन्हे करण्यात सराईत व सक्रिय १०८ गुन्हेगार ज्या मध्ये घरफोडी करणारे २२, जबरी चोरी करणारे १७, मोटार सायकल व इतर चोरी करणारे ६९ आरोपीतांना पोलीस मुख्यालय वाशिम येथे आणुन त्यांचे विचारपुस करून त्यांचे समुपदेशन करण्यात आले तसेच त्यांचे हालचालीवर बारईकाने लक्ष ठेवण्यास सुरूवात करण्यात आली. असता १३ आरोपीत हे गुन्हा करण्याचे तयारीत असतांना त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे वर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली. तसेच पोलीस त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवुन आहेत.